||रामकृष्णहरी||

**प्रवीणकुमार घम**

व्यवस्थापक, श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती

कार्यकारी अधिकारी, श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे कार्यालय

जि. सोलापूर – ४१३३०४

फोन नं –(०२१८६)२२४४६६/२२३५५०

ईमेल – eotemple@gmail.com

जा. क्र. भक्त निवास का.वि./ /२०२६ दिनांक: ०३/०८/२०२६

**–: जाहीर दरपत्रक :–**

विषय :– भक्तनिवासातील वातानुकुलीत खोल्यांमध्ये दरवाजास गोदरेज डोअर क्लोजर खरेदी करणेबाबत..

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीने भाविकांना निवासाची सोय उपलब्ध करून देण्यासाठी सर्व्हे नं ५९ येथे श्री विठ्ठल रुक्मिणी, वेदांत व व्हिडिओकॉन भक्तनिवासातील खोल्या ह्या भाविकांचे निवासाकरीता देण्यात येतात.

भक्तनिवासातील बी सी व डि विंग येथे नव्याने वातानुकुलीत यंत्रणा बसवणे चालु असून, वातानुकुलीत यंत्रणा पुर्न चालाणेकामी सदर खोल्या बंदीस्त असणे आवश्यक असलेने, दरवाजा स्वयंचलीत बंद होणे आवश्यक आहे. त्याकामी स्वयंचलीत यंत्रणा (गोदरेज डोअर क्लोजर) खरेदी करणेचे अटी व शर्ती श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास येथे पहावयास मिळतील. आपले कडील दरपत्रक या कार्यालयाकडे दि.१८/०८/२०२६ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत श्री संत तुकाराम भवन येथे सिलबंद लिफाफ्यात सादर करावे. दरपत्रक उशिरा अथवा अपूर्ण असल्यास विचारात घेतले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | तपशील | क्वांटिटी | जीएसटीसह प्रति नग दर |
|---|---|---|---|
| १ | गोदरेज डोअर क्लोजर (स्वयंचलीत यंत्रणा) | १२५ | |
| | | | |
| | | एकुण जीएसटी सह दर | |

आपले कडील दरपत्रक या कार्यालयाकडे दि.१८/०८/२०२६ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत श्री संत तुकाराम भवन येथे सिलबंद लिफाफ्यात सादर करावे. दरपत्रक उशिरा अथवा अपूर्ण असल्यास विचारात घेतले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

व्यवस्थापक,
श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर.

श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर जि.सोलापूर – ४१३३०४

भक्तनिवास विभाग/का.वि./      /२०२६

श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे श्री विठ्ठल रुक्मिणी, वेदांत व व्हिडिओकॉन भक्तनिवासामधील वातानुकुलीत खोल्यांचे दरवाजाकरीता स्वयंचलीत यंत्रणा (गोदरेज डोअर क्लोजर) खरेदी करणे एकूण सर्व करांच्या दरासह दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

1. स्वयंचलीत यंत्रणा (गोदरेज डोअर क्लोजर) पुरवठा करणेची माहिती कार्यालयीन वेळेत श्री.विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास विभाग येथे उपलब्ध होवून मिळतील. दरपत्रक स्वतंत्र सिलबंद लिफाफ्यात दि.१८/०८/२०२६ सायंकाळी ०५.०० पूर्वी सादर करणे आवश्यक आहे. लिफाफ्यावर ठेकेदाराचे नाव व पूर्ण पत्ता आणि 'स्वयंचलीत यंत्रणा (गोदरेज डोअर क्लोजर) व वाहतूक खर्चासह' दरपत्रक असा सविस्तर तपशिल नमूद करावा. दरपत्रक समक्ष श्री. संत तुकाराम भवन येथे सादर करावेत किंवा रजिस्टर पोष्टाने पाठवावे. उशिरा आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत.
2. स्वयंचलीत यंत्रणा (डोअर क्लोजर) गोदरेज कंपनीचाच पुरवठा करणेचा आहे.
3. स्वयंचलीत यंत्रणा (गोदरेज डोअर क्लोजर) खरेदीबाबत अधिक माहितीसाठी संपर्क क्रमांक : 02186 – 228888.
4. स्वयंचलीत यंत्रणा (गोदरेज डोअर क्लोजर) पुरवठा करणेच्या कालावधीत सदर प्रक्रियेस विलंब झाल्यास, बदल झाल्यास त्याचे सर्व अधिकार कार्यकारी अधिकारी श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांनी राखून ठेवलेले आहेत.
5. कोणतेही दरपत्रक अगर सर्वच दरपत्रके कोणतेही कारण न दर्शविता नाकारणे किंवा स्विकारणे अथवा स्थगित ठेवणे किंवा रद्द करणे याबाबतचे संपूर्ण अधिकार मंदिरे समितीने राखुन ठेवलेले आहेत.
6. पुरवठा धारकाच्या कोणत्याही शर्ती व अटी मंदिरे समितीवर बंधनकारक असणार नाहीत.
7. मंजूर पुरवठा धारकास मिळालेले काम मंदिरे समितीचे मागणीनुसार पुरवठा आदेश दिल्यानंतर १५ दिवसांच्या आत पुरवठा करणे बंधनकारक आहे. त्यास विलंब झाल्यास पुरवठा धारकास जबाबदार धरून मालाच्या किंमतीच्या ५% पर्यंत दंड आकारण्यात येईल.
8. स्वयंचलीत यंत्रणा (गोदरेज डोअर क्लोजर) पुरवठा मागणीप्रमाणे न झालेस अथवा योग्य प्रतीचे/गुणवत्तेचे नसल्यास अगर ठरवून दिलेल्या मुदतीत न झाल्यास मंदिरे समितीची अडचण होऊ नये. म्हणून चालू बाजारभावानुसार इतर पुरवठादाराकडून आवश्यकतेनुसार पुरवठा करण्यात येऊन, त्यासाठी जादा लागलेल्या फरकाची रक्कम पुरवठाधारकाच्या बीलातील रक्कमेतून वसुल करणेत येईल.
9. स्वयंचलीत यंत्रणा (गोदरेज डोअर क्लोजर) पुरवठा शासकीय कार्यालयाकडून कर, उपकर, जकात यांचे दरामध्ये काही बदल झाल्यास त्याबाबत समिती व्यवस्थापनाकडे मागणी करता येणार नाही.
10. स्वयंचलीत यंत्रणा (गोदरेज डोअर क्लोजर) पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/नैसर्गीक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी पुरवठाधारकांच्या नियंत्रणाबाहेर असेल उदा. आग, महापूर, घातपात, रोगराई, संप, स्फोट,

टाळेबंदी, भुकंप वैगेरे) पुरवठाधारक काम करू शकले नाही व त्यामुळे पुरवठाधारकाचे नुकसान झाल्यास, त्यासाठी मंदिरे समिती व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

11. स्वयंचलीत यंत्रणा (गोदरेज डोअर क्लोजर) पुरवठा मंजुर दर व जीएसटी व्यतिरिक्त इतर कोणतेही कर अदा केले जाणार नाही. तसेच सदर पुरवठा कामाचे बील अदा करताना नियमानुसार 2% आयकर व जीएसटी टीडीएस कपात केली जाईल. सदरकामाचे देयक एकरकमी अदा करण्यात येईल.

12. स्वयंचलीत यंत्रणा (गोदरेज डोअर क्लोजर) पुरवठा कामासाठी ॲडव्हान्स रक्कम अदा केली जाणार नाही.

13. स्वयंचलीत यंत्रणा (गोदरेज डोअर क्लोजर) पुरवठा करण्याचे ठिकाण श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास पंढरपूर, जि. सोलापूर राहील.

14. स्वयंचलीत यंत्रणा (गोदरेज डोअर क्लोजर) पुरवठा कामाचेवेळी वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस पुरवठाधारक जबाबदार राहील.

15. स्वयंचलीत यंत्रणा (गोदरेज डोअर क्लोजर) पुरवठा कामाचे देयक सादर करताना देयकामध्ये आदेशातील वर्णनाप्रमाणे संपूर्ण तपशील असणे आवश्यक आहे. संक्षिप्त स्वरूपात उल्लेख करू नये. देयक छापील स्वरूपात असावे. त्यामध्ये बिल क्रमांक, दिनांक, साहित्याचे वर्णन, दर, जी.एस.टी., सही, शिक्का, व इतर अनुषंगीक बाबीचा समावेश असावा.

16. स्वयंचलीत यंत्रणा (गोदरेज डोअर क्लोजर) पुरवठा करणेच्या अटी व शर्तीबाबत कोणत्याही पुरवठा धारकास न्यायालयामध्ये दाद मागता येणार नाही.

17. कमी जास्त दराचे दरपत्रक स्विकारणेचा, नाकारण्याचा अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार मंदिरे समितीने राखुन ठेवलेला आहे. त्याबद्दलची कारणे, स्पष्टीकरण देणे मंदिरे समितीवर बंधकारक राहणार नाही.

18. स्वयंचलीत यंत्रणा (गोदरेज डोअर क्लोजर) पुरवठा दरपत्रक कार्यादेश नसुन फक्त बीड ऑफ कोटेशन मागविण्यासाठी आहे.

19. मंदिरे समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटी व शर्तीत जे बदल करेल ते ठेका धारकास बंधनकारक राहील.

20. स्वयंचलीत यंत्रणा (गोदरेज डोअर क्लोजर) पुरवठा कामासंबंधी काही वाद उद्भवल्यास त्यासाठी न्यायालयीने कार्यक्षेत्र पंढरपूर, जि. सोलापूर हे राहील.

21. प्रशासकीय व अन्य कारणास्तव किंवा कोणतेही कारण न देता दरपत्रक प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द अथवा स्थगित ठेवण्याचा अधिकार मंदिरे समितीने राखुन ठेवलेला आहे.